# प्रेसनोट

जा.क्र.पोउपआ/वाहतूक/पुणे शहर/ /२०१९ पुणे, दिनांक – २०/०३/२०१९

**विषय :- मुदतबाह्य झालेल्या व इतर वाहतुक नियमभंग करणा-या वाहनांबाबत वाहतुक शाखा व प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे यांचेमार्फत संयुक्त मोहीम राबवून कारवाई केले बाबत.**

---

पुणे शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीत चालण्यासाठी वाहतूक शाखेकडून नियमीत प्रयत्न करण्यात येत असून, वाहनचालकांकडून करण्यात येणा-या वाहतूक नियमभंगामुळेच अनेक लहान मोठे अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे. वाहनचालकांना शिस्त लागून अपघाताचे प्रमाण कमी व्हावे याकरीता वाहतूक शाखेतर्फे वेळोवेळी विशेष मोहिम राबवून वाहतूक नियमभंग करणा-या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येते.

मा. पोलीस आयुक्त, श्री. के. व्यंकटेशम् यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे पोलीस उप आयुक्त, वाहतुक , श्री.पंकज देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली पुणे शहर वाहतुक शाखा व प्रादेशिक परिवहन कार्यालय पुणे यांनी संयुक्तपुणे दिनांक- १८/०३/२०१९ रोजीपासून मुदतबाह्य झालेल्या व इतर वाहतुक नियमभंग करणा-या वाहनांबाबत विशेष मोहीम राबवून कारवाई करण्यात आली असून सदर कारवाईमध्ये १२ वाहनांवर मुदतबाह्य झालेल्या व इतर वाहतुक नियभंगाबाबतची कारवाई करण्यात आली असून सदरची संयुक्त कारवाईची विशेष मोहीम यापुढेही राबविली जाणार आहे.

तरी वाहनचालकांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, वाहतूकीच्या नियमांचे तंतोतंत पालन करून शहरातील वाहतुक सुरळीत करण्यात योगदान द्यावे.